क्रमांक/कक्ष-२१/आस्था/४/कावि/ ६६ /२०१२
जिल्हाधिकारी अमरावती यांचे कार्यालय,
दिनांक :-30/०४/२०१२

प्रति,

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन
गाडगेनगर अमरावती

२. तहसिलदार ------------------ सर्व

विषय :-अखिल भारतीय सेवेतील व राज्य शासकीय सेवेतील अधिकारी / कर्मचा-याचे गोपनीय अहवालांचे प्रतिवेदन व पुर्नविलोकनासाठी कॅम्प्स आयोजित करण्याबाबत .

संदर्भ:-मा आयुक्त अमरावती यांचे पत्र क्रमांक आकाअ/गो.ली/प्र.क्र.९/ २०१२ दिनांक २९.०३.२०१२

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार अखिल भारतीय सेवेतील व राज्य सेवेतील अधिका-यांचे / कर्मचा-यांचे गोपनीय अहवालाचे प्रतिवेदन / पुर्नविलोकन करणे बंधनकाकरक करण्यात आले आहे. विहित मुदतीत गोपनीय अहवाल प्रतिवेदित / पुर्नविलोकित झाले नाहीत, तर संबंधित प्रतिवेदन / पुर्नविलोकन अधिकारी यांची वेतनवाढ रोखण्यात येणार आहे.

जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी व तालुकास्तरावर सर्व कार्यालयाच्या प्रमुखांकडून गोपनीय अहवाल प्रतिवेदन / पुर्नविलोकन करुन घेण्याची जबाबदारी तहसिलदार यांची आहे. त्यासाठी प्रतिवेदन व पुर्नविलोकन कॅम्प्सचे आयोजन करण्याबाबत संदर्भाकित शासन निर्णयात निदेश देण्यात आलेले आहेत. शासन निर्णयातील तरतुदीनुसार आपल्या स्तरावर खालील प्रमाणे कॅम्प्सचे आयोजन करण्यात यावे.

| अ.क्र. | कॅम्प | दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रतिवेदन कॅम्प | १२/०५/२०१२<br>१३/०५/२०१२ |
| २ | प्रनर्विलोकन कॅम्प | २६/०५/२०१२<br>२७/०५/२०१२ |

उपरोक्त कॅम्पला सर्व संस्करण अधिकारी / प्रतिवेदन अधिकारी / पुर्नविलोकन अधिकारी यांना हजर राहण्याबाबत सुचित करावे. तसेच जिल्हास्तरावर व तहसिल स्तरावर कॅम्प आयोजित करण्याचे ठिकाण निश्चित करुन त्या ठिकाणची माहिती या कार्यालयात कळविण्याबाबत सर्व आपले अधिनस्त विभाग प्रमुख कार्यालय प्रमुख यांना पत्र देण्यात यावे.

सर्व अधिकारी / कर्मचा-यांनी स्वयंमुल्यांकन लिहिल्यानंतर गोपनीय अहवाल संबंधित प्रतिवेदन अधिका-यांकडे ३० एप्रिल पर्यंत न चुकता सादर करण्याबाबत अवगत करावे.

तसेच आपल्या कार्यालयातील व आपल्या अधिनस्त कार्यालयातील प्रतिवेदन / पुर्नविलोकन अधिका-याचे नाव व मोबाईल क्रमांक तसेच ज्या प्रतिवेदन / पुर्नविलाकन अधिका-यांची बदली

General lettern 91

सहसंचालक तंत्र शिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, अमरावती
आवक क्र. 2288 दिनांक 06/05/2012

एप्रिल अखेर पर्यत दुस-या ठिकाणी झाली आहे त्यांना देखिल बोलवायचे आहे त्यांना कोणता दिवस सोईस्कर आहे त्याबाबत त्यांना विचारणा करुन अशा अधिका-याची नावे सुध्दा मागवावी.

तसेच कार्यालय निहाय संस्करण / परीक्षण अधिका-याचे नाव व ज्या अधिकारी / कर्मचा-याचे गोपनीय अहवाल प्रतिवेदित / पुर्नविलोकित करणार आहे, त्या अधिकारी / कर्मचा-यांची प्रतिवेदन / पुनर्विलोकन अधिकारी निहाय संख्या मागवावी व कॅम्पला येतांना सदर माहितीसह उपस्थित राहण्याबाबत सुचित करावे

अशीही शक्यता आहे की, एखादया कार्यालयातील कार्यालय प्रमुखांकडून कॅम्पसच्या दिनाकापूर्वी गोपनीस अहवाल प्रतिवेदित / पुनर्विलाकित झाले असतील अशा कार्यालय प्रमुखांनी शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रमाणपत्र सादर करावे. उपरोक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. १० नुसार जे प्रतिवेदन / पुनर्विलोकन अधिकारी त्यांच्याकडील गोपनीय अहवालाचे काम पूर्ण करण्याच्या दिनांकापर्यात मंजूर करण्यात येणार नाही. याबाबत आपल्या अधिनस्त सर्व कार्यालय प्रमुखांना अवगत करावे.

तसेच उपरोक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र ११ नुसार जे अधिकारी सदर कालावधीत सेवानिवृत्त झाले असतील, अशा अधिका-यांनी सेवानिवृत्तीनंतर लगेचच एक महिन्याच्या आत गोपनीय अहवाल प्रतिवेदित / पुर्नविलोकित करुन तसे केल्याचे प्रमाणपत्र संबंधित सस्करण अधिका-याकडे सोपविणे आवश्यक आहे.सेवानिवृत्त अधिका-यांचे सेवानिवृत्ती विषयक लाभ मंजूर करणा-या अधिका-याने संस्करण अधिका-यांकडून सदर प्रमाणपत्र प्राप्त करुनच अशा अधिका-याचे सेवानिवृत्तीनंतर रजा रोखीकरणाचे देयक कोषागाराला सादर करावे.

कोणत्याही परिस्थितीत सर्व कर्मचा-याचे गोपनीय अहवाल प्रतिवेदन / पुनर्विलोकन कॅम्पमध्ये आपल्या कार्यालयातील कॅम्पच्या दिवशी किंवा तत्पूर्वी लिहून घेतले जातील याची नोंद घ्यावी अशाच प्रकारच्या सूचना आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व कार्यालय प्रमुखांना सुध्दा द्याव्यात.

संस्करण अधिका-याने गोपनीय अहवालांची सत्वर छाननी करुन गट अ , ब आणि क मधील अधिकारी / कर्मचा-याचे सर्व प्रकारचे गोपनीय अहवाल संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना कळण्याच्या दृष्टीने गोपनीय अहवालाची झेरॉक्स प्रत दि. ३० जून २०१२ पूर्वी द्यावी व मूळ प्रतिवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेण्यात यावी. तसेच झेरॉक्स प्रत डाकेने पाठवावयाची झाल्यास ती अग्रेषण पत्रासोबत नोंदणीकृत टपालाव्दारे पाठवावी डाकेने पाठविलेली पोचपावती गोपनीय अहवालासोबत ठेवावी.

जिल्हयातील सर्व कार्यालय प्रमुख यांनी दिनांक ३०/०४/२०१२ पर्यत गोपनीय अहवाल प्रतिवेदिन व पुनर्विलोकित झाले याबाबतचा अहवाल या कार्यालयात सादर करावा.व गोपनीय अहवाल प्रतिवेदित व पुनर्विलोकित झाले नसल्यास सर्व कार्यालय प्रमुखांनी वरील कॅम्पच्या दिनांकास सभागृह क्र.१ जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती येथे गोपनीय अहवाल प्रतिविदित व पुनर्विलोकित करण्यासाठी न चुकता हजर राहावे.

जिल्हाधिकारी अमरावती

General lettern 92

# सहसंचालक तंत्रशिक्षण

विभागीय कार्यालय, गाडगेनगर, अमरावती

दूरध्वनी : ०७२१ २५७३०२७ /२५७२५७७ संकेतस्थळ www.jdroamt.org.in
फॅक्स ०७२१ २५७७९१३ इमेल roamravati.dte@gmail.com

जा क्र विकाअ/लले/गो अह/२०१२/293 दिनांक ९.५.2012

**परिपत्रक**

विषय : गोपनीय अहवालाचे प्रतिवेदन व पुनर्विलोकनासाठी आयोजित कँप बाबत.

संदर्भ : १) शासन निर्णय क्र. सीएफआर १२१०/प्र क्र ४७/२०१०/तेरा, दि १.१.२०११.
२) मा विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र. आकाआ/गो ली/प्र क्र ९/२०१२, दि. २९.३.२०१२.
३) मा जिल्हाधिकारी, अमरावती यांचे पत्र क्र कक्ष २१/आस्था ४/७७/२०१२, दि. ४.५.२०१२.

उपरोक्त विषयाचे बाबतीत तसेच संदर्भांकित पत्रांचे अनुषंगाने कळविण्यात येते की, प्रादेशिक कार्यालय प्रमुखांकरीता विभागीय आयुक्त, जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी आणि तालुकास्तराव तहसिलदार हयांचेवर शासनाने गोपनीय अहवालाचे प्रतिवेदन व पुनर्विलोकन करुन घेण्याची जबाबदारी सोपविली असून त्याकरीता उपरोक्त प्रत्येक स्तरावर खालील प्रमाणे कँपचे आयोजन करण्यात आले आहे.

| अ क्र | कँप | दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रतिवेदन कँप | दि. १२ व १३ मे, २०१२ |
| २ | पुनर्विलोकन कँप | दि. २६ व २७ मे, २०१२ |

आपले कार्यालयातील प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकारी यांची नांवे, मोबाईल क्रमांक आणि प्रतिवेदीत/पुनर्विलोकीत करावयाच्या गोपनीय अहवालाची संख्या तसेच संस्करण अधिका-याचे नांव व मोबाईल क्रमाक ही माहिती संबंधित कार्यालयास **विनाविलंब** कळविण्यात यावी. तसेच संबंधित कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधून आपले कार्यालयातील गोपनीय अहवालाबाबतची सद्यस्थितीबाबत अहवाल सादर करावा.

तसेच आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास दि. १०.५.२०१२ (संध्या. ५.००) पर्यंत न चुकता सादर करावा.

सोबत मा. जिल्हाधिकारी, अमरावती हयांचे दि. ४.५.२०१२ चे पत्र जोडले आहे.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
वि.का., अमरावती

प्रतिलिपी :

१ प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती
२ प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती/मूर्तिजापूर/खामगांव/वाशिम/यवतमाळ
३ प्राचार्य, निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ.
४ प्राचार्य, डॉ पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती
५ प्राचार्य, गितादेवी खंडेलवाल इन्स्टीटयूट ऑफ फार्मसी, डाबकी रोड, अकोला
६ प्रक्रिया योजक, तंत्रशिक्षण, वि.का., अमरावती (पत्र वेबसाईट वर प्रकाशित करण्याकरीता)